# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
## पिंपरी ४११०१८.
### जाहिरात क्रमांक -१२६५ /२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी आस्थापनेवरील गट 'अ' ते 'क' संवर्गातील खालील प्रमाणे नमूद केलेल्या संवर्गातील रिक्त पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्यासाठी, प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेप्रमाणे पदांची शैक्षणिक अर्हता व इतर बाबींची पूर्तता करणा-या पात्र उमेदवारांकडून Online पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

**पदनाम,पदसंख्या, व आरक्षण तपशिल :-**

<table>
<tr><th rowspan="2">अ.क्र.</th><th rowspan="2">पदनाम</th><th rowspan="2">गट</th><th>अ.जा.</th><th>अ.ज.</th><th>वि जा अ</th><th>भ ज ब</th><th>भ ज क</th><th>भ ज ड</th><th>वि मा प्र</th><th>इ मा व</th><th>ई डब्ल्यु एस</th><th>खुला</th><th>एकूण</th></tr>
<tr><th>S.C.</th><th>S.T.</th><th>VJ (A)</th><th>NT (B)</th><th>NT (C)</th><th>NT (D)</th><th>SBC</th><th>OBC</th><th>EWS</th><th>Open</th><th>Total</th></tr>
<tr><td>१</td><td>क्ष किरण शास्त्रज्ञ</td><td>अ</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>१</td><td>-</td><td>१</td><td>२</td></tr>
<tr><td>२</td><td>टि.बी.ॲड चेस्ट फिजिशियन</td><td>अ</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>१</td><td>१</td></tr>
<tr><td rowspan="2">३</td><td rowspan="2">वैद्यकीय अधिकारी</td><td rowspan="2">ब</td><td>१</td><td>१</td><td>-</td><td>१</td><td>-</td><td>१</td><td>-</td><td>३</td><td>२</td><td>४</td><td>१३</td></tr>
<tr><td colspan="11">समांतर आरक्षण- महिला- इमाव-१, खुला-२<br>दिव्यांग-१<br>दिव्यांग प्रवर्ग- a)OA, OL, BL, LC, Dw, AAV b) SLD c)MD involving (a) to (b) above</td></tr>
<tr><td rowspan="2">४</td><td rowspan="2">स्टाफ नर्स</td><td rowspan="2">क</td><td>८</td><td>३</td><td>१</td><td>-</td><td>-</td><td>१</td><td>१</td><td>७</td><td>७</td><td>४२</td><td>७०</td></tr>
<tr><td colspan="11">समांतर आरक्षण-<br>महिला- अनु.जाती-१, अनु.जमाती०१, इमाव-२,ईडब्ल्युएस-२,खुला-१३<br>माजी सैनिक- अनु.जाती-१, इमाव-१,ईडब्ल्युएस-१, खुला-६<br>अंशकालीन कर्मचारी- अनु.जाती-१, इमाव-१, ईडब्ल्युएस-१, खुला-०४<br>प्रकल्पग्रस्त- खुला-२ भुकंपग्रस्त- खुला १ , खेळाडू- खुला-०२<br>अनाथ- ०१<br>दिव्यांग- ०३<br>दिव्यांग प्रवर्ग- a)LV b)OL, CP, LC, Dw, AAV c)SLD, MI d)MD involving (a) to (c) above</td></tr>
<tr><td>५</td><td>सांख्यिकी सहाय्यक</td><td>क</td><td>१</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>१</td><td>-</td><td>१</td><td>३</td></tr>
<tr><td>६</td><td>लॅब टेक्निशियन</td><td>क</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>१</td><td>-</td><td>-</td><td>१</td></tr>
<tr><td>७</td><td>एक्स रे टेक्निशियन</td><td>क</td><td>-</td><td>१</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>१</td><td>१</td><td>३</td></tr>
<tr><td rowspan="2">८</td><td rowspan="2">फार्मासिस्ट</td><td rowspan="2">क</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>१</td><td>-</td><td>१</td><td>५</td><td>७</td></tr>
<tr><td colspan="11">समांतर आरक्षण-<br>महिला- खुला-२<br>माजी सैनिक- खुला-१<br>अंशकालीन कर्मचारी- खुला-१</td></tr>
<tr><td rowspan="2">९</td><td rowspan="2">ए.एन.एम.</td><td rowspan="2">क</td><td>५</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>-</td><td>३</td><td>३</td><td>२०</td><td>३१</td></tr>
<tr><td colspan="11">समांतर आरक्षण-<br>महिला- अनु.जाती-२, , इमाव१ ,ईडब्ल्युएस-१, खुला-६<br>माजी सैनिक- अनु.जाती-१, खुला-३<br>अंशकालीन कर्मचारी- अनु.जाती-१ खुला-२<br>प्रकल्पग्रस्त- खुला-१ खेळाडू- खुला-१<br>दिव्यांग-०१<br>दिव्यांग प्रवर्ग- a)LV b)OL, CP, LC, Dw, AAV c)SLD, MI d)MD involving (a) to (c) above</td></tr>
</table>

**१.पदनिहाय आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव**

| अ.क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | क्ष-किरण शास्त्रज्ञ | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील रेडीओलॉजी विषयातील एम.डी. /डी.एन.बी.पदवी धारक आवश्यक.<br>२) सदरहू कामकाजाचा किमान ५ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>३) इंडीयन मेडीकल कौन्सिलकडील अथवा महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलकडील रजिस्ट्रेशन आवश्यक.<br>४) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |

| | | |
|---|---|---|
| २ | टी. बी. अॅन्ड चेस्ट फिजीशियन | १)सांविधिक विद्यापीठाची एम.डी. /डी.एन.बी. (चेस्ट व टी.बी. डिसीज) मधील पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण आवश्यक.<br>२) सदरहू कामकाजाचा किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ३ | वैद्यकीय अधिकारी | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी आवश्यक.<br>२) महाराष्ट्र मेडीकल कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ४ | स्टाफ नर्स | १) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील बी.एस्सी. नर्सिंग अथवा जी.एन.एम. शिक्षणक्रम पूर्ण<br>२) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ५ | सांख्यिकी सहाय्यक | १)मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील सांख्यिकी विषयातील पदवी (बी.एस.सी स्टॅटीस्टीक्स/ बी.एस.सी. अप्लाईड/ स्टॅटीस्टीक्स कम्प्लीटेड/ स्टॅटीस्टीक्स) आवश्यक.<br>२) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ६ | लॅब टेक्निशियन | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाची बी.एस्सी. ही पदवी आवश्यक.<br>२) शासनमान्य संस्थेकडील डी.एम.एल.टी. कोर्स उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ७ | एक्स रे टेक्निशियन | १) भौतिकशास्त्र विषयासह मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील बी.एस्सी.शाखेची पदवी आवश्यक.<br>२) शासनमान्यता प्राप्त संस्थेकडील एक्स रे टेक्निशियन या विषयातील एक्स रे टेक्निशियन कोर्स आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ८ | फार्मासिस्ट | १) मान्यताप्राप्त विद्यापीठाकडील डी.फार्म/बी फार्म पदवी आवश्यक.<br>२) इंडियन/महाराष्ट्र फार्मसी कौन्सिलकडील नोंदणी असणे आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |
| ९ | ए.एन.एम. | १) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल यांचेकडील मान्यताप्राप्त ए.एन.एम. अथवा जी.एन.एम. कोर्स उत्तीर्ण अथवा बी.एस्सी. नर्सिंग उत्तीर्ण असणे आवश्यक.<br>२) महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील नोंदणी आवश्यक.<br>३) मान्यता प्राप्त शासन संस्थेकडील संगणक अर्हता आवश्यक. |

**२.वेतनश्रेणी**

| | | |
|---|---|---|
| २.१ | क्ष-किरण शास्त्रज्ञ | पे लेवल S-२३ र.रु.६७७००-२०८७०० |
| २.२ | टी. बी. अॅन्ड चेस्ट फिजीशियन | पे लेवल S-२३ र.रु.६७७००-२०८७०० |
| २.३ | वैद्यकीय अधिकारी | पे लेवल S-२० र.रु.५६१००- १७७५०० |
| २.४ | स्टाफ नर्स | पे लेवल S-१३ र.रु. ३५४००-११२४०० |
| २.५ | सांख्यिकी सहाय्यक | पे लेवल S-८ र.रु. २५५००-८११०० |
| २.६ | लॅब टेक्निशियन | पे लेवल S-१३ र.रु. ३५४००-११२४०० |
| २.७ | एक्स रे टेक्निशियन | पे लेवल S-१३ र.रु. ३५४००-११२४०० |
| २.८ | फार्मासिस्ट | पे लेवल S-१० र.रु. २९२००-९२३०० |
| २.९ | ए.एन.एम. | पे लेवल S-८ र.रु. २५५००-८११०० |

**३.वयोमर्यादा :-**

| | |
|---|---|
| ३.१ | अ.क्र.१ ते ०९ वर नमूद सर्व पदांसाठी अर्ज करणा-या उमेदवारांना किमान वयोमर्यादा १८ वर्ष राहील तसेच खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे व मागास प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे इतकी राहील.<br>प्रकल्पग्रस्त,भुकंपग्रस्त,दिव्यांग उमेदवार यांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.<br>अंशकालीन उमेदवारास कमाल वयोमर्यादा ४६ वर्षे राहील.<br>माजी सैनिक उमेदवारास विहीत वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक ०३ वर्षे इतका राहील.<br>अनाथ व खेळाडू उमेदवारास कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. |
| ३.२ | प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार अर्ज करणा-या उमेदवारांने दिनांक ३०/१२/२०२१ पर्यंत किमान व कमाल वयोमर्यादा धारण करणे आवश्यक आहे. |
| ३.३ | शासकीय/निमशासकीय सेवेत आस्थापनेवर कार्यरत असलेल्या उमेदवारांना वयोमर्यादेची अट लागू राहणार नाही. |
| ३.४ | अ.क्र. १ व २ वरील पदांकरीता उच्च गुणवत्ताधारक तसेच प्रदिर्घ अनुभव असलेल्या उमेदवारांच्याबाबत वयोमर्यादा शिथिल करण्याचा हक्क मा.आयुक्त यांना असेल. |

| | |
|---|---|
| ३.५ | अपवादात्मक शैक्षणिक अर्हता किंवा अनुभव किंवा दोन्ही धारण करणा-या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा शिथिल करण्याविषयी समितीकडून विचार करण्यात येईल.परंतू समितीच्या कार्यनियमावलीतील प्रमाणानुसार जेव्हा मुलाखतीसाठी उमेदवार प्राप्त होत नसतील तेव्हाच हा नियम विचारात घेतला जाईल. अशा प्रत्येक प्रकरणी उपलब्ध उमेदवारांच्या उच्चत्तम शैक्षणिक अर्हतांच्या दोन स्तर उच्च शैक्षणिक अर्हता प्राप्त उमेदवारच वयोमर्यादेत सवलतीकरीता विचारात घेतले जातील.अनुभवाच्या संदर्भात ज्या पदावरील किमान अनुभव मागितला असेल त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अनुभव वयोमर्यादा शिथिल करण्यास्तव विचारात घेतला जाईल. याबाबत अंतिम निर्णय मा.आयुक्त यांचा असेल. |

**४.परिक्षा शुल्क**

| | |
|---|---|
| ४.१ | मागास व अनाथ प्रवर्गातील उमेदवारांनीं र.रु.१५०/- व अमागास/खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी र.रु.३००/- याप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे. |
| ४.२ | उमेदवारास प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमधील एकापेक्षा अधिक पदाकरीता अर्ज करावयाचा असल्यास अशा प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज सादर करुन त्यासाठी स्वतंत्र परिक्षा शुल्क भरणे बंधनकारक राहील |
| ४.३ | माजी सैनिकांसाठी परीक्षा शुल्क माफ राहील. |

**५. Online अर्ज करण्याची अंतिम मुदत-** दिनांक ३०/१२/२०२१ रोजी सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील.

**६. पदाची कर्तव्य व जबाबदा-या –**

| | |
|---|---|
| ६.१ | वैद्यकीय व रुग्णालयीन सेवा याप्रकारचे नेमून दिलेले कामकाज व संबंधित अन्य कामकाज करणे बंधनकारक राहील. |
| ६.२ | निवड झालेल्या उमेदवारांची नियुक्ती महानगरपालिकेच्या कोणत्याही रुग्णालयात/दवाखान्यात/पोस्ट मार्टम सेंटर येथे आवश्यकतेनुसार करण्यात येईल. |

**७.ऑनलाईन अर्ज सादर करण्याची पध्दत**

| | |
|---|---|
| ७.१ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची सुविधा दिनांक ११/१२/२०२१ ते दिनांक ३०/१२/२०२१ पर्यंत www.pcmcindia.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध राहील. |
| ७.२ | ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याची मुदत वरीलप्रमाणेच राहील. तसेच ऑनलाईन शुल्क भरणेकरीता बँकेमार्फत काही वेळेस अपवादात्मक परिस्थितीत विलंब झालेस अथवा तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास त्याकरीता फक्त ऑनलाईन शुल्क भरण्यासाठी उमेदवारांना वाढीव कालावधी दिनांक ०१/०१/२०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत मुदत देण्यात येत आहे. तदनंतर सदरची लिंक बंद होईल. |
| ७.३ | उमेदवाराने आपला वैध ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक नोंदविणे आवश्यक आहे तसेच सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वैध असणे आवश्यक आहे |
| ७.४ | ऑनलाईन अर्जासोबत ऑनलाईन पध्दतीने भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीत उमेदवारास परत केले जाणार नाही. ऑनलाईन अर्ज भरताना बँकेचे इतर शुल्क उमेदवाराला स्वत: भरावे लागतील. परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरल्यानंतर मिळणारी ई-पावतीची (Transaction Successful झाल्यानंतर) प्रत मुद्रण करून (Printout) स्वत:जवळ ठेवणे आवश्यक आहे. |
| ७.५ | ऑनलाईन अर्ज नोंदणी करण्याकरीता "Create User Accout" यावर क्लिक करुन नाव, संपर्काची माहिती, भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी नमूद करावा तद्नंतर उमेदवारांने स्कॅन केलेले छायाचित्र व स्वाक्षरीची ईमेज(५०० kb पेक्षा मोठे नसलेले) अपलोड करुन "Save" बटन दाबावे त्यानंतर उमेदवाराच्या भ्रमणध्वनी व ई-मेल आयडी वर OTP येईल सदर OTP टाकल्यानंतर Log-in Id व Password, email id द्वारे प्राप्त होईल तद्नंतर सदर Log-in Id व Password वापरून उमेदवाराला अर्ज भरण्याची प्रक्रीया सुरू करता येईल. |
| ७.६ | ऑनलाईन अर्ज भरून झाल्यानंतर Save करावा. त्यानंतर Print वर क्लिक करुन संपूर्ण अर्ज तपासून पहावा, जर अर्जामध्ये काही सुधारणा करावयाची असेल तर Edit या बटनाचा वापर करून माहितीमध्ये आवश्यक सुधारणा करावी. |
| ७.७ | आवश्यकतेनुसार ऑनलाईन अर्जातील माहितीमध्ये सुधारणा करुन, तसेच छायाचित्र व स्वाक्षरी योग्य रितीने अपलोड झाल्याची व इतर माहिती अचूक असल्याची खात्री करुन "make payment" बटनवर क्लिक करून परीक्षा शुल्क ऑनलाईन पध्दतीने भरावे. |
| ७.८ | उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरताना योग्य ती काळजी घ्यावी. उमेदवाराने सदर अर्जात स्वत:बाबतची माहिती अचूक रितीने भरावी. तसेच विहित आकारातील स्वत:चे छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड करावी. आपण भरलेली माहिती योग्य असल्याची खात्री झाल्यानंतर, छायाचित्र व स्वाक्षरी योग्य त्या ठिकाणी अपलोड केल्यानंतर व आवश्यक ते शुल्क योग्य पध्दतीने भरल्यानंतर अर्ज स्वीकृत होईल. एकदा शुल्क भरणा केल्यानंतर भरलेल्या माहितीमध्ये कोणताही बदल करता येणार नाही व त्याबाबतच्या विनंतीचा विचार केला जाणार नाही. |

| | |
|---|---|
| ७.९ | ज्या उमेदवारांना एकापेक्षा जास्त संवर्गात अर्ज करावयाचे असतील अशा उमेदवारांनी एका संवर्गात अर्ज पुर्णपणे भरून शुल्क भरणा प्रक्रीया पूर्ण केल्यावर पुन्हा नव्याने रजिस्ट्रेशन करावयाचे आहे. नव्याने रजिस्ट्रेशन करताना पूर्वी वापरलेला e-mail id/ भ्रमणध्वनी क्रमांक वापरावयाचा आहे. उमेदवारांनी सदर login id व password जतन करणे आवश्यक आहे. |

**८.ऑनलाईन परीक्षा शुल्क भरण्याची पध्दत**

| | |
|---|---|
| ८.१ | ऑनलाइन अर्ज हा परीक्षा शुल्क भरण्याच्या सुविधेसह (Payment Gateway) एकत्रित करून उपलब्ध करून देण्यात आला आहे. |
| ८.२ | परीक्षा शुल्क इंटरनेट बँकींग किंवा क्रेडीट कार्ड किंवा डेबीट कार्ड इ.द्वारे भरता येईल. |
| ८.३ | ऑनलाईन शुल्क भरणा यशस्वी झाल्यानंतर ई-पावती (E-Receipt) तयार होईल ई-पावती तयार न होणे हे परीक्षा शुल्क भरले गेले नाही असे दर्शविते. |
| ८.४ | नोंदणी यशस्वी झाल्यानंतर उमेदवारास ई-पावती मिळेल. सदर ई-पावती व ऑनलाईन अर्जाची प्रत Download करून त्याची प्रत (Printout) ठेवणे आवश्यक आहे. |

**९.फोटो व स्वाक्षरीबाबत सूचना**

| | |
|---|---|
| ९.१ | उमेदवाराने अलिकडच्या काळातील पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो अपलोड करावा. |
| ९.२ | उमेदवाराने फोटो काढताना फ्लॅशचा वापर केल्यास Red Eye येणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ९.३ | उमेदवार चष्मा वापरत असल्यास डोळे दिसतील अशा प्रकारचा फोटो असावा.फोटोमध्ये टोपी, गॉगल,मास्क यांनी चेहरा झाकला जाणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ९.४ | उमेदवारांने स्कॅन केलेले छायाचित्र हे ५००kb पेक्षा मोठे नसेल याची दक्षता घ्यावी. |
| ९.५ | प्रवेशपत्रावर ज्या ठिकाणी स्वाक्षरी अपलोड करणे आवश्यक आहे तेथे अपलोड करावी. सदरची स्वाक्षरी ही उमेदवाराची स्वत:चीच असणे आवश्यक आहे. |
| ९.६ | उमेदवाराने काळया शाईच्या पेनाने पांढ-या कागदावर स्वाक्षरी करुन ती अपलोड करावी. |
| ९.७ | उमेदवाराने स्कॅन केलेली स्वाक्षरीची ईमेज ही ५००kb पेक्षा जास्त नसेल याची दक्षता घ्यावी. |

**१०. अर्ज भरणे व सादर करणेबाबत आवश्यक सूचना :-**

| | |
|---|---|
| १०.१ | उमेदवारांनी विहित नमुन्यातील Online अर्ज भरण्यापूर्वी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर जाऊन सविस्तर जाहिरात अभ्यासावी, भरावयाची सर्व माहिती आपलेकडे उपलब्ध आहे याची खात्री करावी व नंतरच उमेदवाराने Online अर्ज भरुन सादर करावा. |
| १०.२ | विहित नमुन्यातील Online अर्जाशिवाय अन्य कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. |
| १०.३ | उपरोक्त पदांच्या सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ११/१२/२०२१ ते दिनांक ३०/१२/२०२१ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. |
| १०.४ | महाराष्ट्र शासन, केंद्रशासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर सेवेत असलेल्या उमेदवारांनी लगत पूर्वीच्या नियोक्त्याचे ना हरकत प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीचेवेळी सादर करावे. |
| १०.५ | अर्ज करणा-या उमेदवारांनी दि. ३०/१२/२०२१ पर्यंत, ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर सर्व अर्हता धारण करणे/अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे. |
| १०.६ | उमेदवारास एका पदाकरीता फक्त एकाच आरक्षणामधून अर्ज करणे बंधनकारक राहील. |
| १०.७ | अर्जात हेतूपुरस्सर खोटी माहिती देणे किंवा खरी माहिती दडवून ठेवणे किंवा त्यात बदल करणे किंवा पाठविलेल्या दाखल्यांच्या प्रतीतील नोंदीत अनाधिकृतपणे खाडाखोड करणे किंवा खाडाखोड केलेले वा बनावट दाखले सादर करणे, परीक्षा कक्षातील गैरवर्तन, परीक्षेचे वेळी नक्कल करणे, वशिला लावण्याचा प्रयत्न करणे यासारखे अथवा परीक्षा कक्षाचे बाहेर अथवा परीक्षेनंतरही गैरप्रकार करणे, विशिष्ट किंवा सर्व परीक्षांना वा निवडींना अनर्ह ठरविणे यापैकी प्रकरणपरत्वे योग्य त्या शिक्षा करणेचा तसेच प्रचलित कायदा व नियमाचे अनुषंगाने योग्य ती कारवाई करणेचे अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांना असतील. तसेच विहीत केलेल्या अर्हतेच्या अटी पूर्ण न करणारा अथवा गैरवर्तणूक करणारा उमेदवार कोणत्याही टप्प्यावर निवड होण्यास अपात्र ठरेल. |
| १०.८ | वय, शैक्षणिक अर्हता, मागासप्रवर्ग/क्रिमीलेअर प्रमाणपत्र, दिव्यांग, महिला, माजी सैनिक,अनाथ, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त,अंशकालीन कर्मचारी, खेळाडू, अनुभव, पात्रता इत्यादि संदर्भात न चुकता अर्जामध्ये स्पष्टपणे/ निर्विवादपणे दावा करणे आवश्यक आहे. अर्जातील संबंधित रकान्यात स्पष्टपणे दावा केला नसल्यास, संबंधित दाव्याचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराने अर्ज सादर केले नंतर त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही. |

| | |
|---|---|
| १०.९ | वयाच्या पुराव्यासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेला जन्माचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, वय व अधिवासाबाबत शासनाकडील सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणेत येईल. |
| १०.१० | शैक्षणिक अर्हतेसंदर्भात आवश्यक माहिती दिलेल्या क्रमाने नमूद करावी. संबंधित परीक्षेच्या गुणपत्रकावरील दिनांक हा शैक्षणिक अर्हता धारण केल्याचा दिनांक समजणेत येईल व त्या आधारे उमेदवाराची पात्रता ठरविणेत येईल. उमेदवारांचे गुणपत्रिकेत श्रेणी पध्दत असल्यास गुणपत्रकासोबत श्रेणीची यादी किंवा परिक्षेच्या अंतिम गुणांची टक्केवारी नमूद असलेला संबंधित विद्यापीठ/मान्यता प्राप्त संसस्थेकडील अधिकृत दाखला (लेटरहेड) प्रमाणित केलेला कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. |
| १०.११ | अ.क्र.३ ते ९ वरील पदांकरीता ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना कागदपत्रांच्या छाननीशिवाय लेखी परीक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवार लेखी परीक्षा उत्तीर्ण झाला तरी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय निवडीस पात्र राहणार नाही. केवळ परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास निवडीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी संबंधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज करावा. |
| १०.१२ | ज्या उमेदवारांनो यापूर्वी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे सेवायोजन कार्यालय / समाज कल्याण/आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी/जिल्हा सैनिक बोर्ड/अपंग कल्याण कार्यालय इ. कार्यालयात नोंदविलेले आहे अशा उमेदवारांनी देखिल स्वतंत्ररित्या ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहिल. तसेच प्रकल्पग्रस्त, अंशकालीन इत्यादी समांतर आरक्षणांतर्गत येणा-या उमेदवारांनी पिंपरी चिंचवड मनपाच्या अधिकृत वेबसाईटवर स्वतंत्रपणे अर्ज ऑनलाईन सादर करणे आवश्यक आहे. |
| १०.१३ | उमेदवारांना ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधी अडचणी आल्यास दूरध्वनी क्रमांक ८८८८००६६६६. वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा. |

**११.लेखी परीक्षा / निवड पध्दती :-**

| | |
|---|---|
| ११.१ | जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या अ.क्र.१ ते २ या गट अ च्या मनपाचे रुग्णालयांकरीता भरण्यात येणा-या पदांसाठी उमेदवारांची संख्या विचारात घेवून लेखी स्पर्धा परिक्षा अथवा थेट मुलाखती घेऊन उमेदवारांची निवड प्रक्रिया करावयाची याबाबत अलहिदा निर्णय घेण्यात येईल.मुलाखतीची/लेखी परिक्षेची तारीख,वेळ व ठिकाण याची माहिती महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ११.२ | लेखी परिक्षा ही अ.क्र.०३ ते ९ या पदांची घेण्यात येईल. सदर पदांचे लेखी परिक्षेचे स्वरुप हे मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, बौध्दिक चाचणी या विषयांवरील प्रश्नांकरीता प्रत्येकी ५० गुण याप्रमाणे २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. |
| ११.३ | उत्तरपत्रिका तपासणीनंतर लेखी परीक्षेस उपस्थित असलेल्या सर्व उमेदवारांना मिळालेल्या गुणांची यादी (परीक्षेचा निकाल) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. |
| ११.४ | लेखी परीक्षेचे ठिकाण, दिनांक, वेळ तसेच बैठक व्यवस्था याची माहिती महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. |
| ११.५ | समान गुण असणा-या उमेदवारांचा गुणवत्ता क्रम, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रानिमं १२१६ /(प्र.क्र.६५/१६)/१३-अ, दि. १३/०६/२०१८ मधील मुद्दा क्र.११ मध्ये दिलेल्या निकषावर लावला जाईल. |
| ११.६ | गुणवत्ता यादीत अंतर्भाव होण्यासाठी उमेदवाराने एकूण गुणाच्या ४५% गुण प्राप्त करणे आवश्यक आहे. |
| ११.७ | परीक्षेच्या वेळी उमेदवाराने ओळखपत्र पुरावा सोबत आणणे बंधनकारक आहे, त्याशिवाय कोणत्याही उमेदवारांस परीक्षेस बसण्यास परवानगी दिली जाणार नाही. |
| ११.८ | निवड यादी व प्रतिक्षा यादी महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ११.९ | भरतीबाबत लेखी परीक्षा किंवा मौखिक मुलाखत जोपर्यंत आयोजित केली जात नाही तोपर्यंत उमेदवाराने महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरील अद्ययावत (Updates) माहिती पाहणे आवश्यक आहे. |
| ११.१० | परीक्षेचे प्रवेश पत्र (Admit Card) मनपा संकेतस्थळावरुन स्वत: डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. |
| ११.११ | लेखी परिक्षेनंतर पात्र उमेदवारांना १:३ या प्रमाणात कागदपत्रे पडताळणीकरीता बोलावण्यात येईल. |
| ११.१२ | लेखी परिक्षेचा निकाल प्रसिध्दीनंतर उमेदवारांची कागदपत्रे तपासणीचे वेळापत्रक महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. कागदपत्रे पडताळणीसाठी शैक्षणिक अर्हता, संगणक अर्हता, अनुभव, जाती प्रमाणपत्र, जातवैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र, वयाबाबतचा पुरावा, अधिवास प्रमाणपत्र, ऑन लाईन शुल्क भरल्याची पावती इ. बाबतची सर्व मूळ कागदपत्रे व त्याचे प्रत्येकी एक साक्षांकित प्रतीसह उमेदवाराने उपस्थित राहणे आवश्यक आहे. कागदपत्रे तपासणीचे वेळी उमेदवार शैक्षणिक व इतर अर्हता धारण करीत नसल्याचे आढळून आल्यास किंवा तपासणीकरिता अपूर्ण कागदपत्रे सादर केल्यास त्याची निवड रद्द करणेत येईल व त्याबाबत उमेदवारांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. |

**१२. सामाजिक व समांतर आरक्षणाबाबत :-**

| | |
|---|---|
| १२.१ | जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतरमागास वर्ग, विशेष मागास वर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम २००० मधील तरतूदींनुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| १२.२ | उमेदवाराने अर्जामध्ये जातीचा व जात प्रवर्गाचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. |
| १२.३ | विमुक्त जाती(अ), भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती(क), भटक्या जमाती(ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग प्रवर्गाकरीता दावा करणा-या उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत आहेत किंवा नाही याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे. |
| १२.४ | उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे शासनाने जाहिर केलेल्या सक्षम अधिका-याचे **दि. ३१/०३/२०२२** पर्यंत वैध असलेले प्रमाणपत्र ग्राहय धरणेत येईल. सदर प्रमाणपत्र सादर करु न शकणारे उमेदवार समांतर तसेच मागासप्रवर्गातील आरक्षणाचा (सामाजिक आरक्षण) लाभ घेण्यास अपात्र होतील. |
| १२.५ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील ("ईडब्ल्युएस) उमेदवारांकरीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक :राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. |
| १२.६ | इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदांकरीता विचार केला जाणार नाही. सदर आरक्षण विषयक नियम हे केवळ महाराष्ट्र राज्यात अधिवास करणा-या उमेदवारांनाच लागू आहे. त्याकरीता उमेदवाराने कागदपत्रे पडताळणीचेवेळी अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| १२.७ | विवाहित स्त्रीयांना विवाह निबंधक यांनी दिलेला विवाह नोंदणी दाखला किंवा नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचीत केलेले शासनाकडील राजपत्र संबंधित उमेदवारांनी कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करावे लागेल. |
| १२.८ | फक्त कायम स्वरुपाचे दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांनाच दिव्यांग प्रवर्गाकरीता ठेवण्यात आलेल्या वयोमर्यादेतील सवलतींचे फायदे देय असतील. तात्पुरत्या स्वरुपातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र असलेल्या प्रवर्गाकरीता दिव्यांग व्यक्तींसाठी असलेले कोणतेही फायदे देय नाहीत. |
| १२.९ | दिव्यांग नियुक्तीकरिता संबंधित व्यक्तीने त्या पदासाठी असलेली विहीत अर्हता धारण करणे आवश्यक आहे. तसेच त्यापदावर काम करण्यास तो सक्षम असला पाहिजे. सदर दिव्यांग उमेदवार संबंधित पदावर नियुक्तीसाठी सक्षम आहे किंवा कसे याची तपासणी नियुक्तीपूर्वी वैद्यकीय मंडळाकडून करुन घेण्यात येईल. |
| १२.१० | नि:समर्थ व्यक्ती(दिव्यांग) व्यक्तीसाठी ठेवण्यात आलेल्या सवलतींचा लाभ मिळण्यासाठी मा.जिल्हा शल्य चिकित्सकांकडील नि:समर्थ व्यक्ती(दिव्यांग)चे प्रमाणपत्र आवश्यक आहे. तसेच नि:समर्थ व्यक्ती(दिव्यांग) प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे. |
| १२.११ | गट 'क' खेळाडूंकरीता अर्हता- सदर पदांसाठी त्या त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रीडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्यपद स्पर्धेत प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू अथवा भारतीय खेळ प्राधिकरणाने आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील ग्रामीण व महिला क्रीडा स्पर्धातील प्रथम, द्वितीय, तृतीय स्थान किंवा सुवर्ण रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू अथवा भारतीय शालेय खेळ महासंघ यांनी आयोजित केलेल्या राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शालेय क्रीडा स्पर्धामधील प्रथम, द्वितीय व तृतीय स्थानः किंवा सुवर्ण, रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू अथवा अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा प्रकारामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त करणारा किंवा सुवर्ण रौप्य किंवा कांस्य पदक प्राप्त करणारा खेळाडू, हा खेळाडू आरक्षणासाठी पात्र असेल. राज्य अजिंक्यस्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोशिएशनने स्वतः आयोजित केलेल्या असाव्यात. तसेच ज्या खेळाची नोंदणीकृत राज्य संघटना त्यांच्या अधिकृत राष्ट्रीय संघटनेशी संलग्न असेल, तसेच सदर राष्ट्रीय संघटनेला इंडियन ऑलिम्पिक असोशिएशनने संलग्नता दिलेली असल्यास अशा राज्य संघटनेच्या स्पर्धेतील राज्यस्तरीय विजेत्यांनाही खेळाडू आरक्षणाचा लाभ देण्यात येईल. |
| १२.१२ | शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. राक्रीधो/२००२/६८/क्रीयुसे-२ दि.०१/०१/२०१६ नुसार विहीत केलेले क्रीडा प्रकार खेळाडू आरक्षणाकरिता ग्राहय धरणेत येतील, |
| १२.१३ | खेळाडू उमेदवारांनी वरील नमूद शासन निर्णयातील तरतूदीनुसार विभागीय उपसंचालक यांचेकडून खेळाच्या प्रमाणपत्राची पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. त्यामुळे खेळाडू उमेदवारास विभागीय उपसंचालक यांनी क्रीडा प्रमाणपत्र योग्य असल्याबाबत व खेळाडू कोणत्या संवर्गासाठी पात्र ठरतो याबाबत प्रमाणित केलेले प्रमाणपत्र नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक राहील. |
| १२.१४ | उमेदवार माजी सैनिक असल्यास जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केलेला असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर आरक्षणाचा लाभ उमेदवारास देय राहणार नाही. तसेच माजी सैनिक, बडतर्फीने, गैरवर्तणूक किंवा अकार्यक्षमता या कारणासाठी अथवा सैनिकी सेवेसाठी शारिरीक क्षमता नसल्याने किंवा आजारपणामुळे सेवा संपुष्टात आलेले माजी सैनिक/ आणीबाणी व अल्पसेवा अधिकारी वयोमर्यादेच्या सवलतीसाठी पात्र ठरणार नाहीत. |
| १२.१५ | शासन निर्णय क्र.पअंक-१००९/प्र.क्र. २००/२००९/१६ अ, दिनांक २७/१०/२००९ नुसार अंशकालीन उमेदवार या आरक्षणात अर्ज केलेल्या उमेदवारास कागदपत्रे पडताळणीचे वेळी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| | अन्यथा सदर आरक्षणाचा लाभ उमेदवारास देय राहणार नाही. |
| १२.१६ | शासन निर्णय क्र.विकाक-२२१५/प्र.क्र.३३७/१६- अ, दिनांक ०४/११/२०१६ नुसार प्रकल्पग्रस्त व भूकंपग्रस्त या आरक्षणात अर्ज केलेल्या उमेदवारास कागदपत्रे पडताळणीचे वेळी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर आरक्षणाचा लाभ उमेदवारास देय राहणार नाही. |
| १२.१७ | शासन परिपत्रक क्र.अनाथ-२०१८/प्र.क्र.१८२/का-०३, दिनांक २०/०८/२०१९नुसार , अनाथ या आरक्षणात अर्ज केलेल्या उमेदवारास कागदपत्रे पडताळणीचे वेळी विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभागाकडील अनाथ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर आरक्षणाचा लाभ उमेदवारास देय राहणार नाही. |
| १२.१८ | जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या पदसंख्येत/आरक्षणात बदल होऊ शकतो.तसेच मागासवर्गीय आरक्षण व ईडब्ल्युएस आरक्षण यांचे बिंदुनामावली याबाबत भविष्यात शासन निर्णय पारीत झाल्यास अथवा काही बदल झालेस त्यानुसार जाहिरातीत दर्शविण्यात आलेल्या आरक्षणामध्ये व पदसंख्येत बदल होऊ शकतो. |

**१३. इतर सर्वसाधारण अटी/ शर्ती/सूचना :-**

| | |
|---|---|
| १३.१ | पात्रता/आरक्षणासंदर्भात अर्जामध्ये निर्विवादपणे दावा केलेला असणे आवश्यक आहे. अर्जामध्ये प्रत्येक दाव्याच्या पुष्ट्यर्थ आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याशिवाय पात्रता/आरक्षणाचा दावा ग्राह्य समजला जाणार नाही. |
| १३.२ | महाराष्ट्र मेडीकल कौन्सीलकडील व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिलकडील नोंदणी करणे आवश्यक असणा-या पदांसाठी कौन्सीलकडे नोंदणी अथवा नुतणीकरण केल्याबाबतचे प्रमाणपत्र असणे किंवा कौन्सीलकडे नोंदणीसाठी अर्ज केलेला असणे आवश्यक आहे. |
| १३.३ | उमेदवारांना मुलाखतीची / लेखी परीक्षेची प्रवेशपत्रे, परीक्षेचे वेळापत्रक, बैठकव्यवस्था, कागदपत्रे पडताळणीसाठी पात्र उमेदवारांची यादी, निवेदने, निवड व प्रतिक्षा सूची व इतर सर्व सूचना ह्या वेळोवेळी www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्याबाबत उमेदवारांना लेखी पत्रव्यवहार केला जाणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहाव्यात. संकेतस्थळावरील सूचना पाहिल्या नाहीत या कारणात्सव आलेल्या कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही. |
| १३.४ | शासन निर्णय माहिती तंत्रज्ञान(सा.प्र.वि) विभाग, शा.नि.क्र. मातस २०१२/ प्र.क्र. २०१२/प्र.क्र.२७७/३९, दि.०४/०२/२०१३ अन्वये शासनाने विहित केलेले संगणक अभ्यासक्रम/माहिती तंत्रज्ञानविषयक परीक्षा उत्तीर्ण झालेल्या-उमेदवारांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल. |
| १३.५ | अ.क्र.०१ ते ०३ चे पदांवरील उमेदवारांना महानगरपालिकेच्या सेवेत रूजू होण्यापूर्वी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ यांचे नावे बँक ऑफ बडोदा (विस्तार शाखा पिंपरी चिंचवड महानगरपालिका आवार) यांचेकडील र. रुपये १,००,०००/- ची राष्ट्रीयकृत बँकेची ५ वर्षे मुदतीची Irrevocable Bank Guarantee द्यावी लागेल. तसेच र.रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर किमान ५ वर्ष महानगरपालिका सेवेत नोकरी करणेस संमती असलेबाबत सर्व्हिस बॉण्ड लिहून द्यावा लागेल. रुजू झालेचे तारखेपासून ५ वर्ष कालावधीपर्यंत महापालिका सेवा सोडता येणार नाही व तसे करावयाचे झाल्यास र.रु.१,००,०००/- ची राष्ट्रीयकृत बँकेची Irrevocable Bank Guarantee जप्त करणेत येऊन सदरचे र.रु.१,००,०००/- महापालिका कोषागारात जमा करणेत येतील. |
| १३.६ | सर्व पदांवरील उमेदवारांना महानगरपालिकेच्या सेवेत रूजू होण्यापूर्वी संबंधित पोलिस यंत्रणेकडून चारित्र्य व पूर्वचारीत्र्य पडताळणी अहवाल ०६ महिने कालावधीत सादर करणे बंधनकारक राहील. चारित्र्य व पूर्वचारित्र्य पडताळणी अहवाल प्रतिकूल/अवैध प्राप्त झाल्यास,उमेदवाराची केलेली निवड रद्द करण्यात येईल. व कोणत्याही हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत. |
| १३.७ | निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र शासन,वित्त विभाग शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/सेवा-४, दि.३१/१०/२००५ नुसार नवीन अंशदान निवृत्ती वेतन योजना म्हणजेच परिभाषित अंशदान निवृती योजना (Defined contribution Pension System) लागु राहील. |
| १३.८ | सर्व पदावरील उमेदवारांना महाराष्ट्र शासनाकडील आदेश क्र.एस.आर.व्ही -२०००/प्रक्र१७/२०००/१२,दि. ०१/०७/२००५ अन्वये दि. २८/०३/२००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या २ पेक्षा अधिक असल्यास संबधित उमेदवाराचा नेमणुकीसाठी विचार करण्यात येणार नाही. तसे विहित नमुन्यात र.रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड केलेले प्रतिज्ञापत्र नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. |
| १३.९ | गट 'अ' व 'ब' मधील पदांवर उमेदवारांचे अंतिम निवडीनंतर महापालिका सेवेत रूजू झाल्यानंतर स्थायी वैद्यकीय मंडळ, ससून सर्वोपचार रुग्णालय,पुणे यांचेकडून वैद्यकीय तपासणी करुन घेऊन त्यांचेकडील वैद्यकीय दृष्ट्या कामास पात्र असलेबाबतचा दाखला १ वर्षामध्ये सादर करावा लागेल. स्थायी वैद्यकीय मंडळाने वैद्यकीय तपासणीनंतर अपात्र ठरविलेस कोणतीही पूर्वसूचना न देता तात्काळ सेवा संपुष्टात आणण्यात येईल. तसेच गट 'क' मधील पदांवर उमेदवारांची अंतिम निवड झाल्यावर नियुक्तीपूर्वी महापालिकेच्या रुग्णालयामध्ये उमेदवाराची वैद्यकीय तपासणी केली जाईल व त्यामध्ये शारीरीक व मानसिकदृष्ट्या तो पात्र असल्याचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नियुक्ती दिली जाईल. मनपा रुग्णालयाने अपात्र ठरविलेस कोणतीही पूर्वसूचना न देता तात्काळ नियुक्ती रद्द करण्यात येईल. |

| | |
|---|---|
| १३.१० | उमेदवारांस मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे. |
| १३.११ | उमेदवाराने नोकरीसाठी केलेल्या अर्जात नमूद केलेली माहिती ही अंतिम समजण्यात येईल. अर्जातील माहिती बदलाबाबत नंतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्वीकारले जाणार नाहीत अथवा बदल विचारात घेतले जाणार नाहीत. |
| १३.१२ | निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती नंतर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम व वेळोवेळी होणा-या सुधारणेनुसार सर्व नियम लागू होतील. |
| १३.१३ | निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीनंतर महापालिकेचे सेवानिवासस्थान उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी महानगरपालिकेची राहणार नाही. |
| १३.१४ | निवड झालेल्या गट अ ते क मधील उमेदवारांची नियुक्ती दोन वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल, या कालावधीनंतर सेवासातत्य, परिविक्षाधीन कालावधीबाबत अलहिदा स्वतंत्र निर्णय घेण्यात येईल. |
| १३.१५ | नियुक्तीसाठी पात्र असणा-या उमेदवारांनी विहीत केलेली इतर बंधपत्र/प्रतिज्ञापत्र/वचनपत्र/करारपत्र इत्यादि विशिष्ट स्वरुपात भरुन दिल्याशिवाय महापालिका सेवेत रुजू करुन घेतले जाणार नाही. |
| १३.१६ | निवड प्रक्रिया सुरु झालेनंतर उमेदवाराची निवड झाल्यावर किंवा नियुक्ती दिल्यानंतर कोणत्याही क्षणी उमेदवारानेअर्जात व लेखी परीक्षेचे वेळी दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे,तसेच भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर दबाब आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमांचा अवलंब केल्याचे निदर्शनास आल्यास, त्या उमेदवारांची उमेदवारी, निवड/नियुक्ती कोणत्याही टप्प्यांवर रद्द करण्यात येईल. |
| १३.१७ | पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी/लेखी परीक्षेसाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये स्वखर्चाने यावे लागेल. |
| १३.१८ | रिक्त पदांचे आवश्यकतेनुसार नेमणूका करण्यात येतील. भरतीप्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना असून स्पर्धात्मक परीक्षा स्थगित व रद्द करणे, परीक्षेचे स्वरुप,तारीख व ठिकाण बदलणे, कोणत्याही टप्प्यावर भरती स्थगित/रद्द करण्याचे अधिकार आयुक्त,पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत. |




सही/-
(राजेश पाटील)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८

उप आयुक्त,प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८

